## परिशिष्ट १.

## नाट्यविषयाला वाहिलेली नियतकालिके.

मराठीतील आरंभीच्या नियतकालिकांनी ज्याप्रमाणे निबंध, स्फुट गोष्टी तसेच कादंबऱ्या (क्रमशः) यांना प्रसिध्दी दिली, तशी अनेक छोटी मोठी नाटके नाट्यसंबंधित नियतकालिकांमधून प्रसिध्द झाली. इतर विविध नियतकालिकांमधूनही "नाटक" या विषयावर लेख येऊ लागले होते. अनेक विषयांपैकी एक विषय, एवढेच स्थान त्या नियतकालिकांतून येणाऱ्या "नाटक" या विषयाला मिळत होते. परंतु नाटक हेही समाजजागृतीसाठी एक चांगले साधन असते, नाटकांमुळे लोकाभिरुचीस अनुकूल दिशा लागते व समाजास चांगले वळण लागते. सर्वसामान्य वाचकांना करमणुकीच्या द्वारे ज्ञान देण्यासही नाटक उपयुक्त ठरते. यासाठी ही केवळ नाट्यविषयाला वाहिलेली नियतकालिके त्या काळात काढली गेली. नाट्यवाङ्मय लोकांपुढे आणणे यासाठी तऱ्हेचे हे पहिलेवहिले प्रयत्न होते. यातून काही नाटके प्रसिध्द झाली, तर काही नाटकांची कथानके प्रसिध्द झाली. ही नियतकालिके पुढीलप्रमाणे आहेत :-

| | |
|---|---|
| १. ऐतिहासिक नाटकमाला | मि.स.१८८० |
| २. ऐतिहासिक नाट्यकथावलि | १८८४-१८८९ |
| ३. नाट्यकथार्णव | १८७९-१८९४ |
| ४. नाट्यकथासंग्रह | १८८६ |
| ५. नाट्यकथामाला | १८८७-१८९२ |
| ६. नाटकी | १८९५ |
| ७. नाट्यमाला | १९०५ |
| ८. जगमित्र | १९०९ |

यांपैकी क्र.१,४,६,७,८ ही नियतकालिके एक-एकच वर्ष चाललेली आहेत. या साऱ्या नियतकालिकांचे उद्देश जवळ जवळ समान होते. ते म्हणजे नाटका-बद्दलच्या प्रतिकूल समजाचा निरास होऊन या मनोरंजन साधनाचे वास्तविक स्वरूप व वास्तविक योग्यता कळावी आणि निरनिराळी नाटके वाचकांना

वाचावयास मिळावी. "नाट्यकथार्णव" व "नाट्यकथामाला" वगळता अितर नियतकालिके फार काळ चाललेली दिसत नाहीत. त्यामुळे त्यांचे अुद्देश जरी खूप चांगले होते, तरी ते प्रत्यक्षात अुतरणे शक्य बनण्याचा फारसा प्रश्नच निर्माण होत नाही. तरीही "नाटकी"मधून "भारतीय नाट्यशास्त्राच्या" खालोखाल महत्त्वाचा "दशरूप ग्रंथ" व त्याचे भाषांतर यायला सुरवात झालेली दिसते. त्याचप्रमाणे अितर नियतकालिकांतून पुढीलप्रमाणे नाटके छापून आली आहेत :-

१. अैतिहासिक नाटकमाला - "पेशवे नाटक", "वासुदेवराव नाटक"
२. अैतिहासिक नाट्यकथावलि : "रेमिरामिस", "गुप्तयामरहस्य", "नरगुंदचे बंड", "मोगलाची जूर्फ धामधूम" अित्यादी ग्रन्थे प्रसिध्द झाली.
३. नाट्यकथार्णव - जगन्नाथरावकृत "मतिमन्मथ नाटक","दौलतराव नाटक", "अतिपीडचरित नाटक", "डॉक्टर व वैद्य प्रहसन संग्रह", "व्याघ्रांबरी प्रहसन", "अनुतापशमन नाटक" "मोहविलसित नाटक", "अधिकारदानविवेचना नाटक", "चंडकौशिक नाटक" "वीरोत्तंस नाटक", "गौरन्यायमीमांसा नाटक", "लटपटाध्याय प्रहसन", "प्रमादप्रमोद नाटक", "पतिशिक्षाप्रहसन" "अनर्घराघव नाटक", "बृहत्कथासारसंग्रह", "नीलगिरीदरीविलास नाटक" अित्यादी नाटके प्रसिध्द झाली.
४. नाट्यकथासंग्रह - "ताराशशांक नाटक", "विजयानाटक".
५. नाट्यकथामाला- "तरुण पुरुष", "अुर्मिलापरिचय", "हुंडाप्रहसन", "पुनर्विवाहविस्फोट नाटक", "राज्यदुर्विलास नाटक", "राजविजय नाटक", "[illegible] "भार्याप्रमाद नाटक", "आगासाहेब नाटक", "संगीत विक्रमोर्वशीय नाटक" "स्थानिक स्वराज्यस्थित्यादर्श नाटक", "दैववैचित्र्य अथवा शापविमोचन नाटक", "मित्रांतक नाटक", "सुंदराबाओ नाटक", "श्रीमत्तविडंबन नाटक", "आधुनिक शिक्षणविपाक नाटक", "मालती अथवा पैशाचा तमाशा", "संगीत देवयानी नाटक", "संगीत कादंबरी नाटक", "अैकतर्फी शिक्षण प्रहसन", "शिलेदार नाटक", "संगीत मालविकाग्निमित्र", "पुरुषोत्तम नाटक" अित्यादी सुमारे २६ पुस्तके प्रसिध्द झाली.

६. नाटकी – "मीठ अथवा रुक्मिणीगर्वपरिहार", "अपकृतसुशील", "उत्तर-नलचरित" अशी नाटके आणि "दशरूप" हा मूळ ग्रंथ व त्याचे भाषांतर यातून प्रसिद्ध करायला सुरवात झाली होती.

७. नाट्यमाला – "संगीत उत्तररामचरित", "प्रौज पृथ्वीराज चव्हाण", "संगीत कदलीगर्भा", "प्रौज वीरबाण" अशी नाटके प्रसिद्ध झाली.

८. रंगमित्र – कृ.न.पौंक्षे लिखित "इच्छादेवयानी नाटक" प्रसिद्ध झाले.

या सान्या नियतकालिकांची कामगिरी बिलकूल समीक्षात्मक नाही. फक्त नाट्यविषयाला वाहिलेली, म्हणून त्यांचा उल्लेख आवश्यक ठरतो.

"नाट्यकला" आणि "रंगभूमि" या दोनच नियतकालिकांतून समीक्षात्मक लेख छापले जात होते. यांचा विचार प्रस्तुत प्रबंधात निश्चितच आवश्यक आहे.

"नाट्यकला" हे नियतकालिक नाशिकहून १९०४ पासून अ.वा.वर्वे यांच्या संपादकत्वाखाली निघत होते. हे केवळ नाट्यविषयाला वाहिलेले आणि समीक्षात्मक लेख प्रकाशित करणारे असे मराठीतील पहिलेच नियतकालिक होय. म्हणून या उपक्रमाला जास्त महत्त्व आहे. १९०४ ते १९०८ असे ४ वर्षे ते चालले. परंतु वर्ष २ चेच काही अंक फक्त उपलब्ध झाले. त्यांच्या अनुरोधाने या नियतकालिकाची समीक्षाक्षेत्रातील कामगिरी आता पाहू या.

"केवळ नाटकसंबंधाने अनेक विषयांची चर्चा करून त्या कलेची अतिपरस्थ उपयुक्त व मनोरंजक माहिती देणारे पुस्तक" असा हेतु त्या नियतकालिकाच्या मुखपृष्ठावर लिहिला आहे. त्या हेतूच्या अनुषंगाने अनेक लेख देऊन या मासिकाने नाट्यसमीक्षेतील आपली कामगिरी बजावली आहे. अर्थात हा पहिलाच प्रयत्न असल्याने त्यातील लेखांचे स्वरूप नाट्यसमीक्षेच्या दृष्टीने अगदीच प्राथमिक दर्जाचे असले तरी त्यात नाट्यविषयाच्या बऱ्याच अंगोपांगांना स्पर्श करण्याचा प्रयत्न आहे, हे महत्त्वाचे आहे. नाट्यकलेच्या उत्कर्षासाठी काही नव्या योजनाही या मासिकाने लोकांपुढे व नाटकमंडळ्यांपुढे ठेवल्याचे दिसते. नाट्यकलेचे सशास्त्र शिक्षण देण्याची योजना आणि यासाठी उपयुक्त अशा विविध

नाट्यविषयसंग्रह (नटांचे फोटो, रंगसामग्री, नाट्यविषयक ग्रंथ इत्यादी) तयार करण्याची योजना असे नवे उपक्रम योजत असल्याचे त्यांच्या जाहिरातीद्वारा कळते. यात तात्त्विक चर्चा स्वतंत्रपणे झालेली आढळत नाही. प्रयोग वा पुस्तक परीक्षणात विवेचनाच्या ओघात एखाद्या तत्वाची वा नव्या विचाराची नोंद आढळते. ब.वा.वर्दे यांनी "समजुतीचा घोटाळा" या नावाने "She stoops to conquer" नाटकाच्या भाषांतराचा (भाषांतरित नाटकाचा) प्रयोग डेक्कन कॉलेजात झाला त्याचे एका लेखात परीक्षण केले आहे. त्यात "भाषांतर आपल्या सामाजिक चालीरीतींना जुळते होते, मूळ नाटकातील सौंदर्य होता होईल तो कायम राखण्याचा प्रयत्न केला होता, याचे तयार करण्याचे कामी शंकरराव पाटकर यांनी अविश्रांत श्रम घेतले होते" असे लिहिले आहे. यावरून भाषांतरित नाटक यशस्वी होण्यासाठी काय गोष्टी आवश्यक आहेत याचा विचार झालेला असावा असे अनुमान काढता येईल. परीक्षण या दृष्टीने या लेखाचा विचार करता नाटकाचे लेखन व प्रयोग अशा दोन्ही दृष्टींनी विचार केलेला आढळतो, मात्र तो फार त्रोटक आहे. "श्री ज्ञानेश्वर महाराज" या नाटकाच्या परीक्षणाच्या निमित्ताने नाटक व त्याची रंगावृत्ती वेगवेगळी असणे हे क्षुद्रवृत्तीचे आहे असे आपले मत स्पष्टपणे मांडले आहे. नाट्यप्रयोगा-संबंधी, प्रायोगिकतेच्या दृष्टीनेही काही विचार झालेला या लेखांमधून आपल्याला दिसतो. प्रत्यक्ष नाटक रंगभूमीवर सादर करण्यापूर्वी तालीम करणे आवश्यकच असते, तरच सुविहित नाट्यप्रयोग उभा करता येईल. त्याचप्रमाणे नाटक कसे पहावे यासंबंधी प्रेक्षकांना नियम, नाट्यप्रयोगाचे हक्कासंबंधी कायदा, नाटकापुरती वेगळी मनोवृत्ती दाखवण्यातले कौशल्य, तोंडावर वयोमानानुसार येणाऱ्या सुरकुत्या घालवण्याचे उपाय, इत्यादी अनेक अंगांचा विचार या लेखांमधून झालेला आढळतो.

"खेडप्रयोग" हा नवा विचार "नाट्यकले"ने मांडलेला आहे. "सबंध रात्र-भर ५/७ किंवा १० जणांना एकच नाटक प्रयोग पहाण्याऐवजी दोन-तीन प्रकार दृष्टीस पडले तर बरे, असे केव्हा केव्हा प्रेक्षकांना वाटत असते व नाटकमंडळ्या सुद्धा पात्रांची उणीव असल्यास किंवा नवीन प्रयोग जवळ उरला नसल्यास

काही काही नाटकांतले अेकेक अंक निवडून करून दाखवतात. अशा प्रकारच्या अंकप्रयोगांना ते "पुष्पगुच्छ" "पंचपेड खिचडी" किंवा "चव चव मुरंबा" अशी नें नावे देत असतात. या अंकप्रयोगांसाठी निवडलेले अंक मूळचे कितीही सरस असले तरी त्यांची ही खिचडी फारशी हृदयंगम होत नाही असा अनुभव आहे. आमच्या मते अशा अंकप्रयोगांसाठी २-२, ३-३ अंकांची बनवलेली लहान नाटकेच तयार व्हावीत. याचा आणखी अेक अुपयोग असा की अेखाद्या अुत्सवात, समारंभात थोड्याश्या रंगसामग्रीत व अल्प पात्रांत नाटकप्रयोग करून दाखवण्याचा प्रसंग ये येतो त्याला या प्रकारचे नाटकांचे तुकडे चांगले अुपयोगी पडतील" या विचारानुसार लहान नाटके देण्याचा अुपक्रम "नाट्यकले"ने चालू केला होता. तसेच अभिनयाचा अभ्यास करण्यासाठी छोटे छोटे तुकडे, प्रसिद्ध नाटकातले अुतारे तसेही दिले जात.

२८ ऑगस्ट १९०५ ला मुंबईस महाराष्ट्र नाटक मंडळीचे संमेलन झाले. गणेश श्रीकृष्ण अुर्फ दादासाहेब खापर्डे यांनी अध्यक्षस्थान भूषवले होते. त्यांचे भाषण व संमेलनात वाचले गेलेले महत्त्वाचे निबंध यांचा गोषवारा या मासिकात दिलेला आढळतो. खापर्डे यांनी आपल्या भाषणात पाश्चात्य व संस्कृत दोन्ही नाट्यज्ञांच्या मताप्रमाणे नाट्यकलेची अुत्पत्ती आनंदापासूनच असते. याशिवाय नाटक ही आबालवृद्धांस व्यावहारिक व आध्यात्मिक दोन्ही तऱ्हांचे शिक्षण देणारी शाळा म्हणून समाजसुधारकांनी हिची चिंता ठेवली पाहिजे. "जी वस्तु जशी असेल, तशी ती नाही असे सिद्ध करून नवीन वस्तूचा तीवर आरोप करणे याला रूपक म्हणतात व हाच प्रकार नाटकात घडतो. "दशरूप" नावाचा संस्कृतात प्रसिद्ध ग्रंथ आहे, त्यात नाट्यविषयाचेच चर्चा आहे. आणखी अेक सू सूचना अशी करावयाची आहे की, शेक्सपियरची अथवा अितर परकीय कवींची नाटके करताना पोशाख, देहस्वभाव वगैरे गोष्टी ज्या तऱ्हेने दाखवल्या जातात ती तऱ्हा बरोबर नाही. माझ्या मते अशा नाटकात पात्रांची नावे शेक्सपियरचीच ठेवावीत, पोशाखही साधारण त्यांचाच ठेवावा, भाषा मात्र मराठी असावी आणि मग देहस्वभावही त्यांचेच दाखवावे किंवा नावे, पोशाख, देहस्वभाव व अभिनय सर्व आमचेच ठेवावे. पण संकर करू नये. या संकरापासून विरस

होतो. व नटांनी पुष्कळ परिश्रम करूनही प्रेक्षकांवर व्हावा तसा परिणाम होत नाही. शिवाय आपल्या चालीरीतीला निराळे व अनिष्ट वळण लागू पडते."

डी.के.कुंटे यांनी संमेलनात वाचलेल्या निबंधात नाटकातील संगीत हे अभिनयाला मारक ठरते असे सांगितले आहे. ते म्हणतात – "अभिनय हा नाट्यकलेचा प्राण होय. पण त्याचा परिपोष संगीत नाटकात होत नाही. अभिनयाला व्यत्यय येणार नाही अशा ठिकाणी संगीत ठेवल्यास ते क्षम्य होते. व अशाच ठिकाणी ते खुलते. अभिनयचातुर्य, स्वभाववैचित्र्य, रसाविर्भाव ही जी नाट्यकलेची खरी अंगे त्यांचा यथातथ्य परिपोष करण्यास विशेषकरून गद्य नाटकेच समर्थ होत. ऐतिहासिक नाटके तर गद्यच असली पाहिजेत. तथापि नाटकाचा विषय, कालस्थलविचार, रस वगैरे पाहून तारतम्याने निवडक पात्रांना योग्य पदे ठेवलेली संगीत नाटके ही अस्वीकार्य होऊ नयेत.

नाटक हे संसाराचे जर चित्र असते तर काव्यमिश्र म्हणजे संगीत नाटकांनी हा हेतु पुरीच सिध्दीस जात नाही.

संगीत नाटकात गाणारी मुले १२–१५ वर्षांची असतात. त्यांचा आवाज थोड्या दिवसांत फुटतो, व्यसने लागून त्यांचे उर्वरित आयुष्य फुकट जाते इत्यादि गोष्टी लक्षात घेऊन या मुलांची जबाबदारी मालकांनी स्वतःकडे घेऊन त्यांना शास्त्रीय गायन शिकवून त्यांची देखभाल केली पाहिजे अशी आदर्श सूचनाही दिलेली आढळते. मांगले यांनी आपल्या निबंधात म्हटले आहे की, नाट्यकलेचा सशास्त्र अभ्यास केलेले नट दुर्मिळ आहेत. सभ्य व सुशिक्षित प्रेक्षक नाटकमंडळ्यांवर आपले वजन पाडीत नाहीत इत्यादी कारणांमुळे नाटकमंडळ्यांना सध्या अवनत स्थिती आली आहे. काळाला अनुरूप अशीच नाटके, कंपन्यांनी निवडावीत, अन्यथा तशी नवीन नाट्यरचना करावी, तरच ती लोकप्रिय ठरतील.

"नाटकी स्त्रिया" या लेखात (वर्ष २ अंक २) म्हटले आहे की, "नाटकांतील पुरुषांचा स्त्रीवेष कितीही हुबेहूब दिसण्यासारखा नटकला गेला तरी स्त्रियांमधील स्वभावमधुरता आणि मर्यादशीलपणा हे पुरुषी स्त्रीवेषाभिनयात कमीच दिसतात. नाटकांतील स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनी व पुरुषांच्या

पुरुषांनी करावयाच्या या नाट्यव्यवहाराला "अनुरूप" असे भरताच्या नाट्यशास्त्रामध्ये म्हटले आहे. स्त्रीवेष घेणाऱ्या मुलांच्या अुर्वरीत आयुष्यावर घातक परिणाम होतो, त्यामुळे नाट्यव्यवसायाला गौणपणा येतो.

या लेखावर व अन्य लेखांवरही लेखकाचे नाव दिलेले आढळत नाही. अंकात अनुक्रमणिकाही आढळत नाही.

अशा तऱ्हेने नाट्यव्यवसाय, नाटकप्रयोग, अभिनय, भाषांतरित नाटके, संगीत नाटके अित्यादी नाट्यकलेच्या अनेक अंगांचा विचार करून त्यांविषयी मतांचे प्रतिपादन "नाट्यकले"ने लोकांपुढे ठेवले आहे व लोकांच्या विचारांना चालना देण्याचे काम साधले आहे. आणखी अेक वैशिष्ट्यपूर्ण सूचना अशी मांडली आहे की, "राष्ट्राची अेकी साधावयास अेका भाषेची मदत फार चांगली होते व आमच्या मते देशाची राष्ट्रीय भाषा व्हावयाची असेल तर ती हिंदुस्तानी हीच होण्याला पात्र आहे. कोणत्याही भाषेचा प्रसार करण्यास वर्तमानपत्रादि साधनांप्रमाणेच नाटकप्रयोगांचाही अुपयोग विशेष व सुलभ असतो. तेव्हा या कार्याचे राष्ट्रीय महत्त्व लक्षात घेअून नाटक कंपन्यांनी हिंदुस्तानीत नाटकप्रयोग बसवण्याचे मनावर घ्यावे.

जपानी नाट्यकलेच्या विविध अंगांचा स्थूल परिचय करून देणारे लेख सदाशिव वासुदेव मराठे यांनी नाट्यकलेच्या पहिल्या वर्षाच्या नवव्या अंकात प्रसिध्द केला आहे. अेक नवीन विषय म्हणून या लेखाचा सारांश येथे देण्यात येत आहे.

जपानात अितर करमणुकींपेक्षा नाटकांकडे लोकांचा ओढा फार असतो. जपानी प्रेक्षकवर्ग गुणग्राही, शांत व आनंदी असतो. नाटकगृहाच्या भिंती लाकडी असतात. बहुतेक नाटकगृहे दोन मजली असतात. प्रेक्षकांची जागा दोन मजली आणि रंगभूमीकडला भाग अेकमजली असतो. रंगभूमी तळमजल्यापेक्षा जरा अुंचावर असते. रंगभूमीवर निरनिराळे अनेक पडदे असतात. पडद्यांची रचना अशी की अेक पडदा वर येतेवेळी दुसरा भिन्न पडदा आपोआप खाली येतो. पडदे व देखावे निपुण चित्रकारांनी रंगविलेले असतात. रंगभूमीवर प्रेक्षकांना मुळीच येऊ देत नाहीत. नाटकपात्रे रंगण्याची जागा पडद्याच्या आतल्या अंगास नसते तर रं

रंगभू

रंगभूमीसमोरील प्रेक्षकांच्या पाठीमागे असते. आणि ती पात्रे प्रेक्षकांच्या मधूनच रंगभूमीवर येतात. रंगपटाजवळ नटांसाठी सुरतम विश्रांतीगृह असते. प्रेक्षकांसाठी निरनिराळ्या दर्जाच्या जागा असतात. खाली बसण्यासाठी स्वतंत्र जागा असतात. गरीब लोकांसाठी प्रत्येक अंकाची वेगवेगळी तिकिटे ठेवलेली असतात. जो अंक पाहावयाचा असेल तेवढ्यापुरतेच तिकिट मिळते. सकाळी [illegible] ११ ते सायंकाळी ७-८ वाजेपर्यंत नाटके होतात. रात्री नाटके करण्यास मनाई आहे.

आपल्याकडच्या नटवर्गापेक्षा जपानी नटांची प्राप्ती चांगली असते. शिवाय त्यांना खेळाचे वेळी प्रेक्षकांकडून बक्षिसेही मिळतात. सुशिक्षित लोक यात मुळीच पडत नाहीत. उनाड, स्वच्छंदी, व्यसनी अशीच माणसे हा धंदा पत्करतात. नटांची समाजात प्रतिष्ठा नाही. नाटक ही कला असते, विद्या नव्हे. कलेची योग्यता विद्येपेक्षा कमी म्हणून नटांना मान नाही. बहुतेक नट दारूबाज, व्यभिचारी असतात. त्यांचे वर्तन चांगले नसते. जपानी नट अभिनयात फारच प्रवीण असतात. मुद्रेत पालट आणि स्वरभेद ही अभिनयाची दोन प्रमुख अंगे आहेत, हे आमच्याकडे प्रसिद्ध नटांनाही असल्याचे वाटत नाही.

नाटके - जपानात धंदेवाईक नाटके मुळीच नाहीत. ऐतिहासिक नाटकेच विशेष होत असतात. १८९९ पासून शेक्सपियरच्या नाटकांची भाषांतरे होऊ लागली आहेत. परंतु त्यांची लोकांना विशेष रुची लागली नाही. यांना शोकपर्यवसायी नाटके पाहणे आवडते. जपानी नाटकात वीर व करुण हे प्रधान रस असतात. बीभत्स रस जपानी नाटकात नाहीच. नाटकातील पात्रे गात नाहीत तर पद म्हणणारा गायकगण रंगभूमीचे एका अंगास तयार केलेल्या माळ्यावर बसून गात असतो.

नाटकाची गायनसंगती - शामीसेन नावाचे तंतुवाद्य व एकाच तोंडास कातडे मढवलेले मृदंगासारखे चर्मवाद्य एवढीच.

नाटकी स्त्रिया - नाटकाचा धंदा करणाऱ्या स्त्रिया असतात. परंतु कायद्यामुळे स्त्रियांची नाटकमंडळी आणि पुरुषांची नाटकमंडळी अशा स्वतंत्र मंडळ्या तिकडे असतात.

"रंगभूमी" व्यतिरिक्त नाट्यविषयक चर्चा करणारे लेख देणारे "नाट्यकला" हे त्याकाळातील एकमेव मासिक होते हे ध्यानात ठेवून आपण "नाट्यकले"ची कामगिरी बघायला हवी आणि हे लेखन नाट्यसमीक्षेच्या दृष्टीने प्राथमिक स्वरूपाचे असले तरी सुरवातीच्या काळात बऱ्याच अंगांचा विचार करण्याची क्षमता दाखवली आहे, या दृष्टीने या मासिकाचे महत्व मानायला हवे.

याशिवाय "रंगभूमि" हे नियतकालिक १९०७ पासून चालू होऊन १९११ पर्यंत चालले. मध्यंतरी बंद पडून नंतर पुन्हा १९२७-२८ मध्ये ही त्याचे काही अंक प्रसिध्द झाले. अशा तऱ्हेने हे नियतकालिक बराच काळ चालले असल्याने त्यात नाट्यविषयक प्रश्नांची बऱ्याच व्यापक प्रमाणावर चर्चा झालेली आढळते. त्यातून नट, नाटककार, नाटके, नाट्यव्यवसाय, रंगभूमी, प्रेक्षक, टीकाकार, संस्कृत नाटकांचा परिचय, पाश्चात्य नाटकांना परिचय, मराठी नाटकांची, तसेच नाट्यप्रयोगांची परीक्षणे, नट व नाटककार यांची चरित्रे इत्यादी विविध विषयांचा परामर्श घेतलेला आढळतो. अशा तऱ्हेने "रंगभूमी"ने नाट्यसमीक्षेच्या क्षेत्रात केलेले कार्य बरोबरीच भरीव स्वरूपाचे व कौतुकास्पद आहे यातील लेखांचा विचार त्या त्या प्रकरणामधून विषयानुसार वेळोवेळी केला आहे.

०००००

## परिशिष्ट २

## १९३५ पर्यंतच्या काळातील महत्त्वाच्या नाटककारांवरचे १९३५ नंतरचे समीक्षा ग्रंथ.

(१) अण्णासाहेब किर्लोस्कर :

१. देसाई, व. शां. – किर्लोस्कर आणि देवल.
सोमैय्या पब्लिकेशन, मुंबई १९७५.

२. फडके, ना. सी. – किर्लोस्कर, देवल, गडकरी यांच्या नाट्यकृती.
रामकृष्ण बुक डेपो, मुंबई १९५०.

३. फडके, ना. सी. – किर्लोस्कर : व्यक्ती आणि कला.
नवीन प्रकाशन, पुणे १९६४.

एका नाट्यकृतीबद्दल :

१. कुलकर्णी, व. दि. – सं० सौभद्र : घटना आणि स्वरूप.
नवीन प्रकाशन, पुणे १९७४.

२. दांडेकर, वि. पां.– सं० सौभद्र : नाट्यसमीक्षा.
विदर्भ मराठवाडा बुक कं., पुणे १९६३.

(२) गो. ब. देवल :

१. काव्यविहारी – नाटककार देवल : व्यक्ति आणि वाङ्मय
जोशी ब्रदर्स बुक सेलर्स, पुणे १९६३.

२. देसाई, व. शां. – किर्लोस्कर आणि देवल.
सोमैय्या पब्लिकेशन, मुंबई १९७५.

३. फडके, ना. सी. – किर्लोस्कर, देवल, गडकरी यांच्या नाट्यकृती.
रामकृष्ण बुक डेपो, मुंबई १९५०.

४. बनहट्टी, श्री. ना. – नाट्याचार्य देवल
पुणे १९६७.

एका नाट्यकृतीबद्दल :

१. सांडेकर, भालचंद्र – सं० शारदा – एक टिपण.
अनमोल प्रकाशन, पुणे १९७९.

(३) <u>श्रीपाद कृष्ण कोल्हटकर</u> :

१. करंदीकर, मी. र. – श्री.कृ.कोल्हटकर : साहित्य आणि संप्रदाय.
श्रीवत्स प्रकाशन, यवतमाळ. १९७६.

२. कुलकर्णी, वा. ल. – श्रीपाद कृष्ण वाङ्मयदर्शन.
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९५९.

३. सानेलकर, गं. दे. – साहित्यपीठ कोल्हटकरः जीवन गाथा.
पारस गौरव ग्रंथमाला, मुंबई १९७२.

४. गोमकाळे, द. रा. – नाटककार कोल्हटकर.
अरुण प्रकाशन, मलकापूर १९५०.

५. जाधव, ना.वं. – श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचा विनोद.
कौस्तुभ प्रकाशन, नागपूर १९८२.

६. माडखोलकर, ग. त्र्यं. – श्री.कृ.कोल्हटकरः व्यक्तिदर्शन
साहित्य सहकार प्रकाशन, मुंबई १९७०.

७. वराडपांडे, म. ल. – कोल्हटकर आणि हिराबाई.
साहित्य सहकार, मुंबई १९६६.

८. वराडपांडे, म. ल. – श्रीपाद कृष्ण कोल्हटकर,
साहित्य अकादमी, दिल्ली १९७२.

९. श्री.कृ.कोल्हटकर विशेषांक – महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जुलै १९७१.

१०. श्री.कृ.कोल्हटकर विशेषांक – आलोचना, नोव्हें-डिसें.१९७१, जाने.१९७२.

(४) <u>कृ. प्र. खाडिलकर</u> :

१. कुलकर्णी, वा. ल. – नाटककार खाडिलकर : एक अभ्यास.
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६५.

२. खाडिलकर, का. ठ. – कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे चरित्र,
चित्रशाळा प्रेस, पुणे १९४९.

३. खाडिलकर नी. य. – नाट्याचार्य खाडिलकरांची नाट्यकला
नी.य.खाडिलकर, मुंबई १९७३.

४. खाडिलकर, य. कृ. - खाडिलकरांच्या नाट्यकृती आणि प्रा. फडके.
५. खाडिलकर, य. कृ. - खाडिलकर - स्मरणी. मुंबई १९४९.
६. खाडिलकर, यमुना - वटवृक्षाच्या छायेत.
प्रकाशक नी. य. खाडिलकर, मुंबई १९७३.
७. देशमुख, बलवंत - खाडिलकरांचे नाट्यसुवर्ण,
अजब पुस्तकालय, कोल्हापूर १९७५.
८. देसाई, व. शां. - खाडिलकरांची नाट्यसृष्टी,
सोमैय्या पब्लिकेशन्स, मुंबई १९७२.
९. पाजणकर, रु. पां. -खाडिलकरांचे नाट्यगुण.
मराठी नाट्य परिषद, बेळगाव १९९०.
१०. फडके, ना. सी. - खाडिलकरांच्या नाट्यकृती.
रामकृष्ण बुक डेपो, मुंबई १९४९.
११. फडके, ना. सी. - नाट्याचार्य खाडिलकरः चरित्र आणि कार्य.
कुलकर्णी ग्रंथागार, पुणे १९७२.
१२. फाटक, न. र. - नाट्याचार्य कृ.प्र.खाडिलकर.
मौज प्रकाशन, मुंबई १९७३.
१३. लेले, पु. रा. - नाटककार खाडिलकर.
जोशी लोखंडे प्रकाशन, पुणे १९६४.
१४. शनवारे ना. ग. - नाट्याचार्य खाडिलकर,
साहित्य अकादमी, दिल्ली १९८२.
१५. शिखरे, दा. न. - नाट्याचार्य खाडिलकर.
ढवळे प्रकाशन, मुंबई १९५३.

टीका नाट्यकृतीबद्दल :

१. गाडगीळ, गंगाधर - खाडिलकरांची तीन नाटके.
सुविचार प्रकाशन, पुणे-नागपूर १९७३.
२. गुप्ते, वात्सला - कीचकवधाचे रूपरंग,
पाठक प्रकाशन, मुंबई १९५९.

३. देसाई, व. शां. - विद्याहरणाचे अंतरंग.
ढवळे प्रकाशन, मुंबई १९४८.

४. सहस्त्रबुद्धे, शं. ना. - सवाई माधवराव यांचा मृत्यू : नाट्यचिकित्सा
विदर्भ मराठवाडा बुक कं. पुणे १९६२.

५. सहस्त्रबुद्धे, शं. ना. - मामावरेकरांचे नाट्यवैभव.
अमरावती, १९५१.

(५) <u>रा. ग. गडकरी</u> :

१. अत्रे, प्र. के. - अप्रकाशित गडकरी,
ह.वि.मोटे प्रकाशन, मुंबई १९६२.

२. कुलकर्णी, श्री. मा. - गडकऱ्यांच्या नाटकातील "स्वगत"
विदर्भ साहित्य संघ प्रकाशन, नागपूर १९५५.

३. कोल्हटकर, चिं. ग. - राम गणेश गडकरी.
ह.वि.मोटे प्रकाशन, मुंबई १९५९.

४. कोठीवाले, वि. ना. - गडकरी जीवनचरित्र.
सुधा प्रकाशन, पुणे ३०, १९७०.

५. गडकरी, प्र. गो. - कै. राम गणेश गडकरी यांच्या आठवणी.
ह.वि. ढवळे, मुंबई १९३८.

६. गोमकाळे, द. रा. - नाटककार गडकरी.
विदर्भ साहित्य संघ, नागपूर १९५३.

७. जोशी, सुमंत - गडकरी स्मृतिमंजुषा.
ठकार आणि कंपनी प्रकाशन, मुंबई १९३५.

८. देसाई, व. शां. - गडकऱ्यांची नाट्यसृष्टी.
सोमैय्या पब्लिकेशन, मुंबई १९८२.

९. पाळणकर, ह. पां. - गडकऱ्यांची नाट्यशैली.
विदर्भ साहित्य संघ प्रकाशन, नागपूर १९५८

१०. फडके, ना. सी. - किर्लोस्कर, देवल, गडकरी यांच्या नाट्यकृती.
रामकृष्ण बुक डेपो, मुंबई १९५०.

११. वरखेडकर, वसंत – गडकऱ्यांची नाट्यप्रकृती व नाट्यसृष्टी.
विदर्भ साहित्य संघ प्रकाशन, नागपूर. १९६१.

१२. वरखेडकर, वसंत – गडकरीकालीन नाट्यतंत्र व गडकरी.
विदर्भ साहित्य संघ प्रकाशन, नागपूर १९६१.

१३. वाळिंबे, रा. शं. – नाटककार गडकरी.
जोशी लोखंडे प्रकाशन, पुणे १९५७.

१४. सरदेशमुख, त्र्यं. वि. – गडकऱ्यांची संसार नाटके
मौज प्रकाशन, मुंबई १९७०.

१५. सहस्रबुद्धे, शं. ना. – नाट्यस्वरूप गडकरी.
अमरावती १९४०.

एका नाट्यकृतीबद्दल :

१. वाळिंबे, रा. शं. – सुधाकर की एकच प्याला.
प्रकाशक अ. ग. जोशी, पुणे १९४९.

२. सहस्रबुद्धे, शं. ना. – भावबंधनातील नाट्यवैभव.
विदर्भ नाट्यमंदिर, अमरावती १९५३.

(६) मा. वि. वरेरकर :

१. वैतुलि, माणिक के. – नाटककार वरेरकर, प्रबंध रौंड.
नागपूर १९५७.

२. गोमकाळे, द. रा. – वरेरकर आणि मराठी रंगभूमी.
वीनस प्रकाशन, पुणे १९५८.

३. वरेरकर जन्मशताब्दी महोत्सव स्मरणिका – १९८३,

(७) प्र. के. अत्रे :

१. अत्रे, प्र. के. – मी कसा झालो. (वाङ्मयीन आत्मशोधन)
परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई १९५३.

२. कुलकर्णी, कृ. पां. – आचार्य अत्रे – विविध दर्शन.
परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई १९५८.

3. गोमकाळे, द. रा. - अत्रे आणि मराठी रंगभूमी, व्हीनस प्रकाशन, पुणे. १९६२.

४ देशपांडे, मा. का - आचार्य अत्रे : चरित्र आणि वाङ्मय, पुणे १९८०

५ नसिराबादकर, ल. रा. - आचार्य अत्रे साहित्यदर्शन, भा. १,२, फडके बुकसेलर्स, कोल्हापूर १९७६.

६ पारखे, व. वि. - साहित्यिक अत्रे, खं. १, डोंबिवली. १९७२.

७ भोसले, एस. एस. - प्र. के. अत्रे : साहित्य आणि समीक्षा अजब पुस्तकालय, कोल्हापूर, १९७६.

८ सामंत, बाळ - अत्रे वाङ्मयदर्शन, भारतीय ग्रंथ भवन, मुंबई. १९६७

## परिशिष्ट - ३

## १९३५ नंतरची नाट्यविषयाला वाहिलेली नियतकालिके

| | | | |
|---|---|---|---|
| १. | नाटक | : | संपा. शं. ना. अंधूटकर, मुंबई - ४ नोव्हें. १९५५ - डिसें. १९५९. |
| २. | नांदी | : | ( युगनांदी ) संपा. सरोज तेलंग, मुंबई - २८, जाने. १९६७ - ऑक्टो. १९६९. |
| ३. | नाट्यदर्पण | : | ( " नाट्यभूमी " तसेच " मराठी रंगभूमि ) संपा. प्रथमत: मो.ग. रांगणेकर व पुढील काळांत सुधीर दामले, मुंबई - ४. एप्रिल १९६८, पासून चालू. |
| ४. | भरतशास्त्र | : | संपा. विनायक पडवळ, मुंबई - १२, सप्टेंबर १९७८, पासून चालू. |